**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**


राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१


राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. ११.६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५५२/ पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री.रामचंद्र हनुमंत गुरव<br>रा.मु.पो.पारगांव, ता.दौंड, जि.पुणे | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | सचिव / चेअरमन, रेणुका सह. दूध संस्था लि.,<br>पारगांव, ता.दौड, जि.पुणे | गैरहजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, (दुग्ध) पुणे<br>दूध योजना आवार, पुणे-३ | हजर |

अपीलकर्त्याने रेणुका सह. दूध संस्थेसंबंधी विविध मुद्दयांची माहिती मागितली होती. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी सदरची माहिती संस्थेकडून प्राप्त करून घेऊन दि. ११.६.२००८ रोजी समक्ष अपीलकर्त्यास दिली आहे. ऑडिट मेमो प्रती अद्याप संस्थेकडून प्राप्त झाल्या नाहीत. त्या अपीलकर्त्यास तात्काळ देत असल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, पुणे यांनी नमूद केले. अपीलकर्त्यास आठ दिवसांच्या आत ऊर्वरित माहिती देण्याबाबत दोन्ही घटकांचे एकमत झाले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.
२. अपिलीय प्राधिकारी यांनी आठ दिवसांत अपीलकर्त्यास ऊर्वरित माहिती देऊन स्वीकृती पत्रासह अहवाल आयोगास सादर करावा.

पुणे
दि. ३.७.२००८

**( विजय कुंवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

२२.६.०८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. ११.६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५५४ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. दिलावर शब्बीर तांबोळी<br>मु.पो.लोणी देवकर, ता. इंदापूर, जि. पुणे | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | विस्तार अधिकारी ( पंचायत ),<br>पंचायत समिती, इंदापूर, ता. इंदापूर, जि. पुणे | गैरहजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | गट विकास अधिकारी, पंचायत समिती इंदापूर,<br>ता. इंदापूर, जि. पुणे | हजर |

अपीलकर्ता श्री. दिलावर शब्बीर तांबोळी यांनी इंदापूर तालुक्यात सन २००२-२००५ या कालावधीतील कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केलेल्या स्त्री-पुरूषांची यादी, सर्पदंश व श्वानदंश लसीकरण, घरकुल योजना, गट शिक्षणाधिकाऱ्यांनी केलेल्या शिक्षकांच्या बदल्या इ. ९ मुद्दयांची माहिती मागितली होती.

अपीलकर्त्याच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४, ५ व ६ बाबतची माहिती अद्याप मिळालेली नाही. अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क भरण्यास नकार दिला. सदरहू माहिती निःशुल्क देण्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी मान्य केले. मात्र अपीलकर्त्याने विस्तृत स्वरूपाची व अनेक विभागांशी संबंधित माहिती एकाच अर्जात मागितली आहे. अर्जावरील सुलभ कार्यवाहीच्या दृष्टीने हे योग्य नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकर्त्यास माहिती दिल्याबाबत अहवाल दि.१६.८.२००८ पर्यंत आयोगास सादर करावा.

**पुणे**
**दि. ३१.७.२००८**

(स्वाक्षरी)
**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

११.६.०८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.११.०६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपीलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५५८ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. बाळकृष्ण गजानन जोशी, अल्प उत्पन्न गट इमारत क्र. ३, गाळा क्र. ४५, महाराष्ट्र हौसिंग बोर्ड, कोनार्क सोसायटी, लक्ष्मीनगर, पुणे-९ | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | अव्वल कारकून, मुरबाड, तहसील कार्यालय, मुरबाड, जि. ठाणे | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | तहसीलदार, मुरबाड, जि. ठाणे | गैरहजर |

अपीलकर्त्याने टपालाने ७/१२ उताऱ्यांची मागणी केली होती. जन माहिती अधिकारी यांनी कूळवहिवाट शाखेकडून माहिती प्राप्त करून घेऊन, तसेच अपीलकर्त्याकडून शुल्क मागणी करून नोंदणीकृत टपालाने सदरची माहिती पाठविली आहे. त्यावर अपीलकर्त्याने कूळवहिवाटदारांची माहिती अद्याप मिळाली नसल्याचे कळविले होते. त्यावर आवश्यक कार्यवाही करून पुन्हा आवश्यक असलेली माहिती नोंदणीकृत टपालाने अपीलकर्त्यास पाठविण्यात आल्याचे दिसते. सबब कोणतीही कार्यवाही करणे शिल्लक राहिल्याचे दिसत नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. २.७.२००८

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

११.६.०८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. ११.६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| १ | अपील क्रमांक | ५५९ व ६०५ / पुणे | उपस्थिती |
|---|---|---|---|
| २ | अपीलकर्ता | श्री. वसंतराव आबासाहेब गरड<br>प्लॉट नं.३४, सर्व्हे नं.४७, विवेकनगर,<br>आकुर्डी, पुणे-३५ | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | १. प्रशासक, भुदरगड नागरी सहकारी पतसंस्था द्वारा न्या. राजन कोचर, ३०, डॅगवीन लेन अे.के. शेठ बिझनेस चेबंर्स, मुंबई-१<br>२. उप निबंधक, सहकारी संस्था (नागरी बँका) महाराष्ट्र राज्य, पुणे | गैरहजर<br><br>हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | १. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे-१<br>२. अप्पर निबंधक, सहकारी संस्था, (तपासणी व निवडणूका), महाराष्ट्र राज्य, पुणे | गैरहजर<br><br>हजर |

अपीलकर्ता श्री. वसंतराव आबासाहेब गरड यांनी भुदरगड नागरी सहकारी पत संस्थेसंबंधी विविध मुद्दयांबाबत माहिती मागितली होती.

प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपीलकर्त्याने राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले आहे. दरम्यानच्या काळात अपीलकर्ता श्री. गरड यांचे निधन झाले आहे, असे प्रबंधक, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर यांनी दि. २७.९.२००८ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त अन्य अपिलात आयोगास कळविले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

११.६.०८

<u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. ३१.७.२००८

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १२.६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५६२ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. तैनुर शफिर शेख<br>रा. आप्पासाहेब पवार मार्ग, शंकुतला लॉन्स मंगल कार्यालयासमोर, श्रावण गल्ली, बारामती, जि. पुणे | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | उपविभागीय पोलीस अधिकारी,<br>बारामती विभाग, बारामती, जि. पुणे | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण कार्यालय,<br>पाषाण, पुणे | हजर |

अपीलकर्ता श्री. तैनुर शफिर शेख यांनी दि. १५.८.२००६ ते दि. १८.८.२००६ या कालावधीतील ध्वनि प्रदूषणाच्या अनुषंगाने एकूण तीन मुद्दयांची माहिती मागितली होती.

वरील तीनही घटकांमधील चर्चा, त्यांनी सादर केलेली निवेदने व चर्चेअंतीचा निष्कर्ष विचारात घेता अपीलकर्त्यास आवश्यक ती माहिती दिली असल्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी नमूद केले असून अपीलकर्त्याने ते मान्य केले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. १४ .७.२००८

(विजय कुवळेकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

११.६.०८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.११.०६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५६५ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. दिलीप ज्ञानेश्वर ओरपे, संपादक, रयतेचा राजा, कळसगाव, मारुती मंदिरासमोर,आळंदी रोड, पुणे-१५ | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | सहाय्यक अन्नधान्य वितरण अधिकारी, मध्यवर्ती इमारत, पुणे-१ | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | अन्नधान्य वितरण अधिकारी, मध्यवर्ती इमारत, पुणे-१ | गैरहजर |

अपीलकर्त्याने अन्नधान्य वितरण कार्यालयातील दोन कर्मचाऱ्यांसंदर्भात त्यांच्या व त्यांच्या नातेवाईकांच्या नावे असलेली स्थावर, जंगम व इतर मालमत्ता, संपत्ती इत्यादी बाबत माहिती मागितली होती. सदरची माहिती ही त्रयस्थ पक्षाची व खाजगी स्वरूपाची असल्याने संबंधित कर्मचाऱ्यांच्या संमतीशिवाय देता येत नाही, व सदरची माहिती ही जिल्हाधिकारी कार्यालय, महसूल शाखा यांच्या कक्षेतील असून त्या कार्यालयाकडून प्राप्त करून घेणे अपेक्षित आहे, असे अपिलीय प्राधिकारी यांनी त्यांच्या निर्णयात नमूद केले आहे. आपल्याला आता माहितीची गरज नाही, आपले समाधान झाले आहे, त्यामुळे अपील निकाली ठेवावे, असे अपीलकर्त्याने उपरोक्त कार्यक्रमात समक्ष नमूद केले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. २.७.२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

११.६.०८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.१८.०६.२००८ रोजी सोलापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५७१ / सोलापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. जयंत बाळकृष्ण कापडी<br>मु.पो.ता.करमाळा, भवानी पेठ, जि.सोलापूर | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक),<br>जिल्हा परिषद, सोलापूर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | शिक्षणाधिकारी (माध्यमिक),<br>जिल्हा परिषद, सोलापूर | हजर |

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ४ अन्वये अद्ययावत माहिती अपीलकर्ता श्री. जयंत बाळकृष्ण कापडी यांनी जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), यांच्याकडे मागितली होती. सदरची माहिती सोलापूर जिल्ह्यातील ८३३ माध्यमिक शाळांकडून प्राप्त करून दोन महिन्यांत अपीलकर्त्यास समक्ष देण्यात येईल, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी लेखी नमूद केले. मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरूपाची आहे, हे लक्षात घेऊन किमान अवधीत करण्याची जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांची विनंती मान्य करण्यात येत आहे. मात्र मूळ अर्ज दि. २४.५.२००६ चा असून गेल्या दोन वर्षांत याबाबत पूर्तता करावयास हवी होती. याची समज जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांना देण्यांत येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.
२. वरील माहिती अपीलकर्त्यास दोन महिन्यात द्यावी व पूर्तता अहवाल अपिलीय प्राधिकारी यांनी दि. [illegible] पर्यंत आयोगास सादर करावा.

पुणे
दि. 39 .७.२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.१८.०६.२००८ रोजी सोलापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५७७ / सोलापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. दगडू अनंता बोराटे<br>मु.पो.झरे, ता. करमाळा, जि. सोलापूर | प्रतिनिधी हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्यूत वितरण कंपनी, करमाळा, जि. सोलापूर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्यूत वितरण कंपनी, बार्शी, जि. सोलापूर | हजर |

अपीलकर्ता श्री. दगडू अनंता बोराटे यांनी नमूद ग्राहक क्रमांका संदर्भातील ए वन फॉर्म जोडणी मागणी अर्जाची छायांकित प्रत, कनेक्शन मंजूर केलेल्या अधिकाऱ्याचे नाव, मंजुरीचा दिनांक, जोडणी दिल्याचा रिपोर्ट छायाप्रत, वीज खंडित करण्यासाठी सहाय्यक अभियंता, करमाळा यांनी दिलेल्या आदेशाची छायाप्रत, वीज खंडित करण्यामागची कारणे, मीटर काढून घेतले त्या वेळच्या मीटर काढल्याचे रिपोर्टची छायाप्रत इत्यादि माहिती मागितली होती.

वरील तीन घटकांत चर्चा झाली. सदर चर्चेअंती अपीलकर्त्याचे प्रतिनिधीनी माहिती मिळाली असल्याचे नमूद केले. माहिती मिळाल्याने आपले समाधान झाले, आपली काही तक्रार नाही, असे अपीलकर्त्याने आयोगास दि. १८.६.२००८ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. 2९ .७.२००८

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. ११.०६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५७८ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. सुरेश किसनराव यादव,<br>मु.पो. सोमेश्वरनगर, ता. बारामती, जि. पुणे | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | नायब तहसीलदार, फलटण, ता. फलटण,<br>जि. सातारा | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | तहसीलदार, फलटण, ता. फलटण,<br>जि. सातारा | हजर |

अपीलकर्ता श्री. सुरेश किसनराव यादव यांनी फलटण तालुक्यातील मौजे काळज येथील गट क्र. ७७०/१ मधून उत्खनन केलेल्या गौणखनिजासंबंधी व उत्खनन परवान्यासंबंधीचे कागदपत्र यांची मागणी केली होती.

मौजे काळज येथील गौणखनिज उत्खनन संदर्भात कागदपत्रांची माहिती मिळावी व मूळ कागदपत्रे पाहावयास मिळावी, तसेच सदरची माहिती व्यक्तिशः हवी आहे, असे अपीलकर्त्याने नमूद केले होते. जन माहिती अधिकारी यांनी माहिती तयार करून संचिका पाहणे व माहिती घेऊन जाण्याबाबत अपीलकर्त्यास पत्रव्यवहार केला. त्यास अपीलकर्त्याने प्रतिसाद दिला नाही. मात्र त्यावर अपील केले. अपीलकर्त्याने तयार माहिती न नेल्यामुळे प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, फलटण यांनी अपील दाखल करून घेण्याच्या मुद्दयावर निकाली ठेवले. विशेष अपील निर्गत कार्यक्रमादिनी दि. ११.६.२००८ रोजी अपीलकर्त्यास समक्ष सदरची माहिती देण्यात आली, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी नमूद केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. ०४ .७.२००८

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

११.६.०८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १२.६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५८२ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. ज्ञानेश्वर वाघू कुडले<br>स.नं.३५, भालेकर वस्ती, वारजे नाका, कर्वेनगर,<br>रत्नदीप कॉलनी, पुणे-५२ | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | पोलीस निरीक्षक, पौड पोलीस स्टेशन,<br>पौड, ता. मुळशी, जि. पुणे | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण विभाग,<br>पाषण, पुणे | गैरहजर |

अपीलकर्ता श्री. ज्ञानेश्वर वाघू कुडले यांनी त्यांच्या घराच्या मागील बाजूच्या झोपडीतील १४ फूटी ३९ तुळया व १६ लोखंडी पत्रे चोरीला गेल्याबद्दल दि. ८.५.२००५ रोजी अर्ज दिला होता. या अर्जावर झालेल्या कारवाईची लेखी माहिती मागितली होती.

प्रथम अपिलाच्या दि. ४.१२.२००६ रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळेस आवश्यक माहिती मिळाल्याने आपले समाधान झाले आहे, असे अपीलकर्त्याने लेखी दिल्याचे अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दि. १२.१२.२००६ रोजीच्या पत्रान्वये अपीलकर्त्याच्या निवेदनाच्या प्रतीसह कळविले आहे.

चोरीस गेलेले पत्रे व तुळया मिळण्याबाबत मागणी केली आहे, ती माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. २२.६.२००८

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

(शिक्का: राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ)

२१.६.०८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. ११.०६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५८५ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. सुरेश किसनराव यादव,<br>मु.पो. सोमेश्वरनगर, ता. बारामती, जि. पुणे | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | उपविभागीय अधिकारी, बारामती उपविभाग,<br>बारामती, जि. पुणे | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | जिल्हाधिकारी, पुणे | प्रतिनिधी हजर |

अपीलकर्ता श्री. सुरेश किसनराव यादव यांनी अर्ज करून फलटण तालुक्यातील मौजे वाघळवाडी आणि मौजे निंबुत येथील दिलेल्या गौणखनिज दगड उत्खनन परवान्यासंबंधीच्या कागदपत्रांची मागणी केली होती.

मौजे वाघळवाडी व मौजे निंबुत येथील गौणखनिज दगड उत्खनन परवान्याच्या माहितीसंदर्भात अपीलकर्त्याने ते दारिद्र्य रेषेतील असल्याचे माहिती अर्जामध्ये नमूद केले होते. तथापि त्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याचा दाखला हजर केला नव्हता. जन माहिती अधिकाऱ्यांनी नक्कल फी भरून माहिती घेऊन जाण्याविषयी त्यांना कळविले होते. त्याप्रमाणे अपीलकर्त्याने दि. ७.११.२००६ रोजी मौजे वाघळवाडी व निंबुत या गावातील गौणखनिजासंबंधी माहिती समक्ष घेतली. त्यावर झालेल्या प्रथम अपिलात अपिलीय प्राधिकारी यांनी अपील फेटाळले. अपीलकर्त्याने गौणखनिज परवान्यासंबंधी १९८६ ते २००६ या कालावधीतील माहिती मागणी केली होती. गौणखनिज प्रकरणांमध्ये तलाठी व ग्रामसेवक यांचे ना हरकत दाखले घेतलेले दिसून येत नाही, असे जन माहिती अधिकारी यांनी तोंडी व लेखी नमूद केले. त्यामुळे अपीलकर्त्यास पुरविण्यात आलेल्या कागदपत्रांमध्ये

त्याचा समावेश नाही. विशेष अपील निर्गत कार्यक्रमात झालेल्या चर्चेत अपीलकर्त्याचा गैरसमज दूर झाला, असे उभय पक्षांनी लेखी नमूद केले आहे. मात्र त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी दाखल्याबाबत लेखी खुलासा करणे आवश्यक होते.

गौणखनिजाच्या संदर्भात तलाठी व ग्रामसेवक यांचे ना हरकत दाखले घेतले नसल्याचे अपीलकर्त्यास सात दिवसात (दि. १८.६.२००८ पर्यंत ) लेखी कळविण्यात येईल, असे जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, फलटण व अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हाधिकारी, पुणे यांच्या वतीने त्यांच्या प्रतिनिधीने मान्य केले. विशेष अपील निर्गत कार्यक्रमात आपल्याला सर्व माहिती प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने मान्य केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. गौणखनिज प्रकरणामध्ये तलाठी व ग्रामसेवक यांचे ना हरकत दाखले केलेले दिसून येत नसल्याबाबत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास लेखी कळविल्याचा पूर्तता अहवाल आयोगास दि. १८.६.२००८ पर्यंत सादर करणे आवश्यक होते. तो न केल्याबद्दल जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांना कडक समज देण्यात येत असून त्यांनी हा आदेश मिळाल्यापासून चार दिवसांत विलंबाच्या स्पष्टीकरणासह पूर्तता अहवाल आयोगास सादर करावा.

**पुणे**
**दि. ०४.७.२००८**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.१७.०६.२००८ रोजी सोलापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५८६ / सोलापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. भाऊसाहेब एकनाथ वीर<br>मु.पो.ता. बार्शी, जि. सोलापूर | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | निवासी नायब तहसीलदार, करमाळा<br>ता. करमाळा, जि. सोलापूर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | तहसीलदार करमाळा, जि. सोलापूर | हजर |

अपीलकर्ता श्री. भाऊसाहेब एकनाथ वीर यांनी सप्टेंबर १९०३ ते ऑक्टोबर १९०३ या काळातील जन्ममृत्यु रजिस्टरची प्रमाणित प्रत व त्यावरून जन्माचा दाखला, श्री. भिवा विठू वीर यांचा दि. १५.१२.१९३१ चा मृत्यूदाखला, जानेवारी १९९० पासून दि. ३०.६.२००७ अखेरच्या अर्जाप्रमाणे जातीच्या दाखल्याची नावानिशी यादी व इतर माहिती मिळावी, अशी मागणी जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, करमाळा यांच्याकडे केली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी काही माहिती दिली. परंतु शेलगाव क या गावाचे जन्ममृत्यू रजिस्टर मिळत नाही, तसेच अभिलेख कक्षात असलेले जन्म मृत्यु रजिस्टर मोडी लिपीत आहे. मोडी लिपी जाणणाऱ्यांकडून माहिती द्यावी लागेल, ती उपलब्ध झाल्यास अपीलकर्त्यास पंधरा दिवसांत दिली जाईल, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी लेखी नमूद केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.
२. अपीलकर्त्यास माहिती पंधरा दिवसांत उपलब्ध करून देण्याबाबतच्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर करावा.

पुणे
दि. ३० .६.२००८

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.१२.०६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५८७ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. दत्तात्रय तुकाराम अवचर<br>श्रीराम कॉम्प्युटर टायपिंग व झेरॉक्स सेंटर,<br>कचेरी रोड, पोस्ट ऑफीस शेजारी, इंदापूर, जि. पुणे | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | तालुका कृषि अधिकारी, तेल्हारा, ता. तेल्हारा<br>जि. अकोला | गैरहजर |
| ४ | अपिलीय अधिकारी | उपविभागीय कृषि अधिकारी, अकोट<br>ता. अकोट, जि. अकोट | हजर |

अपीलकर्ता श्री. दत्तात्रय तुकाराम अवचर यांनी अनुकंपा तत्त्वावर नोकरी मिळण्यासाठी दि. १८.१२.१९९३ ते मार्च २००६ पर्यंत केलेल्या पत्रव्यवहारावर काय उत्तर दिले व अनुकंपा तत्त्वावर नोकरीस पात्र ठरत आहे नाही, याबाबत माहिती मागितली होती.

अनुकंपा तत्त्वावर नोकरी मिळण्याबाबतचा अर्ज वरिष्ठ कार्यालयास पाठविण्याबाबत कार्यवाही करण्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकाऱ्यांनी मान्य केले आहे. मात्र अनुकंपा तत्त्वावर नोकरी मिळण्याबाबतचा विषय प्रशासकीय कार्यवाहीचा असून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. 30.७.२००८

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**-राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.१७.०६.२००८ रोजी सोलापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५९० / सोलापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. विद्याधर केशरचंद दोशी<br>जीवन-तारा, १२६, मोरारजी पेठ,<br>सरस्वती चौक, सोलापूर | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | नगर अभियंता,<br>सोलापूर महानगरपालिका, सोलापूर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | सहाय्यक आयुक्त (सर्वसाधारण),<br>सोलापूर महानगरपालिका, सोलापूर | हजर |

श्री. एस.एन. लामकाने अवेक्षक यांनी रेल्वेलाईन घ. क्र. १६५/६ प्रकरणी विलंब केल्यामुळे शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित केलेली आहे, असे कळविल्याने शिस्तभंगाची कारवाई काय करण्यात आली, तसेच शिस्तभंगाच्या कारवाईची सेवापुस्तकात केलेल्या नोंदीची प्रमाणित प्रत अपीलकर्त्याने जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर यांच्याकडे मागितली होती. माहिती देण्याची व त्यानुसार कागदपत्रे देण्याची पूर्तता जन माहिती अधिकाऱ्याने केलेली आहे, अपील निकाली काढण्यास हरकत नाही, असे अपीलकर्त्याने वरील घटकांच्या निवेदनात नमूद केले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. ७ .७.२००८

( विजय कुवळेकर )
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, **पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.११.०६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५९६ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | १. श्री. विजय अंकुश खांदवे,<br>२. श्री. विनायक प्रभाकर खांदवे, १६-बी,<br>रागविलास सहकारी गृहरचना संस्था,<br>कोरेगाव पार्क, पुणे-१ | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | कामगार तलाठी, लोहगाव, ता. हवेली, जि. पुणे | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | तहसीलदार, हवेली, हवेली तहसीलदार कार्यालय, जि. पुणे | हजर |

अपीलकर्त्याने मौजे लोहगाव, ता. हवेली, येथील नऊ सर्व्हे क्रमांकाच्या जमिनीवर नोंदणीकृत हक्कसोड पत्र संबंधित तलाठी यांना देऊनही आजतागायत नोंद का झाली नाही, याची माहिती मागितली होती. सदरची बाब ही प्रशासकीय कार्यवाहीची होती. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकाऱ्यांनी विहित मुदतीत उत्तर व निर्णय दिला. त्याचबरोबर दि. ११.२.१९९७ रोजी नोंदविलेल्या दस्त क्र.८०९/९७ ची नोंद ७/१२ सदरी फेरफार क्र. २४९८९ अन्वये दि. ७.२.२००७ रोजी घेण्यात आल्याचे अपिलीय प्राधिकारी यांनी त्यांच्या निवेदनात नमूद केले. अपीलकर्त्याने कार्यवाही झाली असून तक्रार राहिली नसल्याचे दि. ११.६.२००८ च्या पत्रानुसार आयोगास कळविले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

<u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. २.७.२००८

(विजय कुवळेकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

११.६.०८